सूचना का अधिकार
RIGHT TO INFORMATION

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत.
(CIN NO. U40109MH2005SGC153646)

द्वारा – अधीक्षक अभियंता (स्था),
कार्यालयाचे नांव :-अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर
उद्योगभवन, १ ला मजला, असेंब्ली रोड, नागाळा पार्क, महावीर बागेसमोर, कोल्हापूर. ४१६ ००३ जि. कोल्हापूर
०२३१-२६५०२८३ (का), ०२३१-२६५०१९३ (वै)
E mail : se3700@mahatransco.in
Website : www.mahatransco.in

जा.क्र.अअ(स्था)/कोप/मासं/५२/ 000839 दिनांक :- 3 SEP 2024

## जाहिर नोटीस

**संदर्भ** :- १) पत्र क्र. महापारेषण/सांका/मासं/का.औ.सं.क.क.वि./१४१४३ दि. ३०.१०.२०१३
२) महापारेषण/सांका/मासं/का.औ.सं.क.क.वि./१४२ दि. ०३.०१.२०१४

अधीक्षक अभियंता (स्था), अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, महापारेषण, उद्योग भवन, पहिला मजला, कोल्हापूर यांचेकडून अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर आणि अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था विभाग, कोल्हापूर/सांगली/कराड या कार्यालयास बाहयस्त्रोताद्वारे कुशल व अकुशल कर्मचारी पुरविणेकरीता नोंदणीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्याकडून दरपत्रक मागविणेत येत आहेत. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील नोंदणीकृत इच्छुक संस्थांनी वर दिलेल्या पत्त्यावरती दि. १३.०९.२०२४ दुपारी ३.०० वाजता उपस्थित राहावे. सदर कामाचा कालावधी दि. ०१.१०.२०२४ ते दि. ३१.०३.२०२५ पर्यंत आहे. पात्र इच्छुक संस्थांना कागदपत्रांची छाननी केलेनंतर त्यांच्या वास्तव्य असलेल्या जिल्हयातील कार्यालयाचे काम दिले जाईल. इच्छुक संस्थांनी खाली नमुद केलेली कागदपत्रे सोबत आणावीत. एका जिल्हयासाठी एकापेक्षा जादा पात्र संस्था झालेस लॉटरीव्दारे अंतिम निर्णय दिला जाईल. तसेच एखाद्या जिल्हयाकरीता उपस्थित संस्थांपैकी कोणी इच्छुक नसल्यास लगतच्या जिल्हयातील उपस्थित संस्थांना सदरचे काम त्यांचे विनंतीवरून दिले जाईल.

१) संस्थेंचा नोंदणी दाखला, महापारेषण SRM विक्रेता नंबर
२) कायमस्वरुपी पत्ता व रहिवाशी दाखला
३) लेबर लायसन्स
४) कामगार राज्य विमा योजना कोड नंबर (दाखला) व ऑगस्ट – २०२४ अखेर वर्गणी भरणा केलेली चलनप्रत.
५) भविष्य निर्वाह निधीचा कोड नंबर (ऑगस्ट – २०२४ अखेर भरणा केल्याची चलन प्रत)
६) व्यवसाय कर क्रमांक व ऑगस्ट – २०२४ अखेर भरणा केल्याचे चलन प्रत
७) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत व्यवसाय परवाना
८) कंत्राटदार संस्थेचे बॅंकेचे नाव, संपूर्ण पत्ता, खाते क्र. व पॅनकार्ड छायांकित प्रत
९) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व ऑगस्ट – २०२४ अखेर वस्तू व सेवा कर भरणा केलेली चलन प्रत.
१०) ऑगस्ट – २०२४ पर्यंत पूर्ण केलेल्या कामांचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र यादी व वर्क ऑर्डर्स.
११) सध्या हातात असलेल्या कामांची यादी कामकाज आदेशासहीत.
१२) दरपत्रक.

तरी सदर बैठकीला इच्छुक संस्थांनी दि. १३.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता या कार्यालयात उपस्थित राहावे.

(संजय किंकर)
अधीक्षक अभियंता (स्था) प्रभारी
अउदा स्था. बांध.नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर

F:\f\UDC (HR)\Outsource\2024-2025\2) Work order & LOI 01.10.2024 to 31.03.2025\E-enquiry Notice.docx